१ **<u>संक्षी. फौ.प्र.क्र.१३७५/२०२५</u>**

**निशाणी क्र.**

<u>मे. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, चाळीसगांव यांचे न्यायालयात</u>

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हयाची घडल्याची तारीख | - २२/०७/२०२५ |
| २. | गुन्हा नोंदणी तारीख | - २२/०७/२०२५ |
| ३. | फिर्यादीचे नाव | - पो.हे.कॉ. २३२ विरेंद्रसिंग केवलसिंग सिसोदे,<br>मेहुणबारे पोलीस स्टेशन,<br>ता. चाळीसगांव, जि. जळगांव. |
| ४. | आरोपीचे नाव - | दिलीप सुरेश पाटील,<br>वय – ४२ वर्षे,<br>रा. भउर, ता. चाळीसगांव, जि. जळगांव. |
| ५. | गुन्हयाची हकीकत | - |

या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात तुम्ही आरोपी दि.२२/०७/२०२५ रोजी ०१.३० वाजताच्या सुमारास मेहूणबारे गावातील बस स्टॅण्ड जवळ चाळीसगांव ते धुळे रोडवर तुमच्या ताब्यातील राखाडी रंगाची मारुती ओमनी वाहन क्र.एम.एच.३०.पी.४४३६ ही रोडावर सार्वजनिक जागी उभी करुन लोकांना अडथळा करुन, रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन, रहदारीस येणारे - जाणारे वाहनास व्यक्तीचे जिवितास धोका उत्पन्न होईल अशा रितीने मिळून आले. त्यानुसार तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८५ नुसार शिक्षेस पात्र गुन्हा केला व मी त्याची दाखल घेतली आहे.

प्रश्न – १. तुम्हाला पोलीस तपासाच्या कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तर - होय.

प्रश्न – २. तुमचेवर ठेवलेला दोषारोप तुम्हाला समजला काय ?

उत्तर - होय.

प्रश्न – ३. तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर - होय, मला गुन्हा कबूल आहे.

-------------------------

आरोपीची सही / अंगठा

समक्ष

Sd/-

(पी.के. कदम)

पॅनल प्रमुख

पॅनल क्र.२, राष्ट्रीय लोक न्यायालय,

चाळीसगांव.

दि.१३/०९/२०२५.

आ दे श

आरोपीने स्वच्छेने गुनहा कबुल केला आहे. शिक्षेबाबत त्याचे म्हणणे ऐकले. अभियोग पक्षातर्फे विधिज्ञांनी आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी युक्तीवाद केला. याउलट आरोपीने यापुर्वी अशा प्रकारचा गुन्हा केला नसल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे आरोपीने गुन्हा करुन कोणत्याही व्यक्तीला अथवा लोकांना त्रास देण्याचा त्याचा कोणताही उद्देश नव्हता असे कथन केले. तसेच त्याने पुढे असे सांगितले की, आरोपी हा गरीब कुटूंबातील कर्ता व्यक्ती असून त्याच्यावर कुटूंबाची जबाबदारी आहे. सबब, आरोपीला कमीत कमी दंड करण्याची विनंती केली आहे.

उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर माझे मते, आरोपीने केलेल्या कथनामध्ये तथ्य आढळून येते. वरील कारणास्तव व गुन्हयाचे स्वरुप लक्षात घेता तसेच आरोपीच्या कौटूंबिक व आर्थिक परिस्थितीचा विचार करुन त्यास शिक्षेमध्ये दया दाखविणे उचित होईल. म्हणून आरोपीविरुध्दच्या गुन्हयाचे स्वरुप पाहून माझे मते खालील शिक्षा न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश परीत करीत आहे.

आदेश

आरोपीस भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७५ प्रमाणे भारतीय न्याय संहिता कायदयाचे कलम २८५ प्रमाणे दंडणीय अपराधास दोषी धरुन रुपये ३००/- दंडाची शिक्षा सुनावण्यात येत आहे. जर आरोपीने दंड न भरलयास, त्याला ०४ दिवस साध्या कारावासाची शिक्षा ठोठावण्यांत येते.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

Sd/-
(पी.के. कदम)
पॅनल प्रमुख
पॅनल क्र.२, राष्ट्रीय लोक न्यायालय,
चाळीसगांव.

दि.१३/०९/२०२५.